# जपानी पुष्परचना - भाग १३

सर्व रसिक वाचकांना नवीन वर्षाच्या खूप खूप मनापासून शुभेच्छा!!



इकेनोबो स्कूलचे खास असे बांबूचे पुष्पपात्र व त्याशेजारी अजून एक छोट्या बांबूच्या पुष्पपात्रामध्ये मुक्त रचना केली आहे.

कागदाचे हिरव्या व राखाडी रंगांचे पंखे या रचनेत फुलांच्या मागे वापरले आहेत. जपानी पुष्परचनेमध्ये बरेचदा असे पंखे वापरले जातात. सातव्या शतकात जपानमध्ये पंख्यांचा वापर सुरु झाला. सुरुवातीला हे पंखे लोकांची समाजातील प्रतिष्ठा दाखविण्यासाठी वापरले जात. युद्धामधे किंवा निरोप लिहून पाठविण्यासाठी यांचा उपयोग केला जाई. त्यानंतर अनेक समारंभ, पारंपारिक सण साजरे करताना सुद्धा लोक वापरू लागले. त्यातूनच पुष्परचनेमध्ये पख्यांचा वापर सुरु झाला. दोन प्रकारचे पंखे आहेत... एक घड्या घालून केलेले पंखे आणि साधे प्लेन पंखे. त्याबरोबर त्यात बांबूच्या काड्या पण वापरलेल्या असतात.

सोबतच्या रचनेत असलेले पंखे कागदाचे घड्या घालून वेगवेगळ्या आकारांचे बनविले आहेत. प्रथम हे पंखे दोन्ही पुष्पपात्रांमध्ये लावून घेतले. मग त्यापुढे एशियाटिक लिलीची गुलाबी फुले लावली आहेत. त्या बरोबर पिवळी व पांढरी शेवंती वापरली आहे. अॅस्परॅगस वेलाने दोन्ही पुष्पपात्रांमधील कनेकशन दाखविले आहे. ही रचना पारंपारिक जपानी मुक्तरचना आहे ज्यात बांबू व जपानी पंखे याचा प्रामुख्याने वापर केला आहे.

**सौ. अरुंधती देशपांडे**
व्हाईस प्रेसिडेंट इकेनोबो इकेबाना पुणे शाखा
asdssd@gmail.com